# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/५४/२०१०/ दिनांक :

प्रति,

सौं. राधाबाई विठ्ठल काळेबाग,
मु.पो. विटा, ता. खानापूर, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली
पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय क्र. २, विटा, जि. सांगली — विरूध्द

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौं. राधाबाई विठ्ठल काळेबाग ह्या पॉवरलूम वापराच्या ग्राहक आहेत. सदर पॉवरलूम ग्राहकासाठी महाराष्ट्र शासनाने तत्कालीन परिस्थितीनुरुप सदर उद्यागाच्या मदतीसाठी यंत्रमाग संजीवनी योजना मंजूर केली. सदर योजनेचा लाभ मिळाला नसल्याने संबधित ग्राहकाने मंचात तक्रार दाखल केली आहे. मंचात येण्यापूर्वी अंतर्गत कक्ष, सांगली यांच्याकडे तक्रार केल्याचे दिसून येते.

सदर कक्षाने सदर ग्राहकास यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळणार नसल्याचा निर्णय दिल्याने नाराज होवून मंचामध्ये अर्ज दि. २.३.२०१० रोजी दाखल केला.

मंचाने सदरचा अर्ज दाखल करुन घेवून पुढील कार्यवाहीचा भाग म्हणून वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय व कागदपत्रे मागविली. सदर म्हणणे दाखल करतांना तक्रार दाखल करुन घेण्यास योग्य नाही, ग्राहक स्वच्छ हाताने मंचापुढे आला नाही, ग्राहकाचा उद्देश लबाडीचा आहे तसेच योजनेच्या लाभासाठी आवश्यक ती रक्कम जमा नसल्याने ग्राहकाचा अर्ज दाखल करुन घेवू नये असे म्हणणे नोंदले आहे. सदरच्या ग्राहकाने मे. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठस्तर, विटा यांचे न्यायालयात रे.दि.मु.नं. २२/०७ ने दावा दाखल केला आहे. मंचापुढे प्रतिज्ञापत्र सादर करतांना सदरची मागणीविषयी इतर न्यायालय / लवाद यांच्यापुढे प्रलंबित वा निकाली नाही असे लबाडीने नोंद केले आहे, तथापि तशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे सदरच्या अर्जासंदर्भात मंचासमोर दाद मागण्याचा कोणताही नैतिक व कायदेशीर अधिकार नाही. म्हणून सदरचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे असे प्रतिपादन केले.

सबब ग्राहकाने अर्जासोबत जोडलेले कागदपत्रे तपासली. वि.प.च्या म्हणण्याप्रमाणे तसा दावा दाखल होता हि वस्तुस्थिती आहे. तथापि सदरील अर्जावर मा. न्यायाधिश यांचा कोणताही आदेश झालेला नाही. ग्राहकाने स्वत:हून सदरचा अर्ज / दावा काढून घेतला आहे. त्यामुळे वि.प.चे म्हणणे ग्राह्य धरता येत नाही. तसेच तरतुदीनुसार अस्तित्वात असलेल्या अंतर्गत कक्ष, सांगली यांनी याकामी निर्णय दिलेला आहे. त्याबद्दल ग्राहकाने मंचापुढे अपिल अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा मुद्दा अंतर्गत कक्षपुढे वि.प.तर्फे मांडला जाणे स्तुत्य होते, तसे झाले नाही. त्यामुळे After thought ( सबब विचारानंतर ) असे वर्तन वि.प.चे वाटते. त्यामुळे प्रथमत: सर्व मुद्दे नोंदविले आहेत. मंचाने रितसर सुनावणी दि. ५.५.२०१० रोजी घेतली. ग्राहक गैरहजर प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन उपस्थित. वि.प.तर्फे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सदर च्या यंत्रमाग संजीवनी योजनेकरीता मार्च २००४ ची बाकी पैकी ५०% रक्कम मार्च २००५ पूर्वी भरणेचे आहे व त्याचबरोबर एप्रिल २००४ ते मार्च २००५ च्या कालावधीमधील चालू बिल रक्कमही त्यासोबत भरणे आवश्यक होते. याचाच अर्थ मार्च २००५ नंतर कोणतीही थकबाकी ग्राहकाची असता कामा नये . यासाठी एप्रिल २००० ची बाकी निश्चित करुन मे २००० ते मार्च २००४ पर्यंतचा हिशोब शासनाने जाहीर केल्याप्रमाणे नव्याने मांडून ग्राहकास मार्च २००४ ची ५०% भरावयाची रक्कम कळविण्याची जबाबदारी वि.प.ची होती. वीज नियामक आयोगाने वेळोवेळी ठरवलेले दर व शासनाने व्यवसायाच्या मदतीसाठी जाहीर केलेले दर यात तफावत होती. आयोगाच्या दरपत्रकाप्रमाणे वि.प.ने बिले अदा केली होती. तसा सी.पी.एल. हिशोब नोंदविला आहे. तथापि फरकाची रक्कम शासन देणार असल्याने मार्च २००५ अखेर कोणतीही बाकी शिल्लक न राहण्याच्या अटीवर सदरची योजना जाहीर झालेली होती. वि.प.ने वेळीच शासनाच्या धोरणाप्रमाणे हिशोब करुन ५०% भरावयाची रक्कम कळविणे आवश्यक होते, तसे एप्रिल २००४ ते मार्च २००५ च्या बिलात नोंदविणे हे सक्तीचे होते सदरील ५०% रक्कमही १५%+१५%+२०% अशी भरावयाची असल्याने वि.प.कडून तशी निश्चित आकडेवारी ग्राहकास कळविणे आवश्यक होते. तसेच कृत्य न झाल्याने सदर ग्राहकास सदर योजनेचा लाभ देणे उचित आहे असे मंचाचे मत झाले आहे. तसेच सदर मार्च २००४ च्या थकबाकीवरील सर्व दंड व व्याज रद्द करावे असे मंचाचे मत आहे तसा मंच आदेश पारीत करीत आहे.

सदरच्या तक्रारदाराचे वि.प.ने हजर केलेले सी.पी.एल. तपासले असतां, बिलाची रक्कम भरण्याकडे कल दिसतो. तसेच वि.प.ने सहाय्यक लेखापाल यांनी तपासलेले बिल जमा नांवे स्टेटमेंट बघता मार्च २००४ रोजी रु. ३४८६६.९६ इतकी बाकी दिसून येते, पण सी.पी.एल. वर मार्च २००४ रोजी रु.५२३८३.२७ इतकी बाकी ग्राहकाकडून येणे दिसते. तसेच जुलैं २००४ च्या नोंदीत बऱ्याचशा रकमेचे जमा (क्रेडीट) दाखविलेले दिसते. त्यामुळे मार्च २००५ रु. १९९०५.५४ इतकी बाकी दिसते, पण प्रत्यक्षात स्टेटमेंटमध्ये सदरची बाकी रु. २२५७५.२६ दिसते. सी.पी.एल.वर वेळोवेळी क्रेडीट दाखवून आलेली बाकी योग्य का स्टेटमेंटची बाकी योग्य ? असा प्रश्न उभा राहू शकतो. त्यामुळे सर्व कागदपत्रांच्या आधारे ग्राहकाने केलेली मागणी कायदेशीर व योग्य असल्याने मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे यंत्रमाग संजीवनीच्या रु. १७४३३.४८ इतक्या रकमेचा लाभ ग्राहकास द्यावा. त्याचप्रमाणे मार्च २००४ च्या बाकीवरील आजअखेर लावलेले व्याज व दंड वगळून, रद्द करुन मार्च २००५ अखेरीस ( संजीवनी लाभ देवून ) येणाऱ्या रकमेचा पुढील सर्व हिशोब नव्याने मांडून ग्राहकास लेखी कळवावा, समजावून सांगावा, त्याची प्रत मंचात हजर करावी.

सर्व बाजूंनी विचार करुन मंच पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) ग्राहकाचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) मार्च २००४ च्या थकबाकीवर ५०% यंत्रमाग संजीवनीच्या सवलतीचा फायदा देवून मार्च २००५ अखेरची देय रक्कम पक्की करावी व त्यापुढील आजअखेर हिशोब नव्याने मांडून ग्राहकास लेखी कळवावा, ग्राहकास समजावून सांगावा.

३) मार्च २००४ च्या पूर्ण थकबाकीवरील व्याज व दंड पूर्णपणे रद्द करावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )<br>सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )<br>अध्यक्ष